

# निबंध स्पर्धेचा निकाल जाहीर

## विद्यापीठातील वुमेन्स स्टडीज सेंटरचे आयोजन







**अमरावती (प्रतिनिधी) :** कोविड -१९ या महामारीचे परिणाम जगभर दिसून आलेत. त्यामुळे व्यक्तिगत, सार्वजनिक जीवनात अनेक समस्या निर्माण झाल्यात. या पार्श्वभूमीवर नव्या पिढीचे मते जाणून घेण्याच्या दृष्टीने संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातील वुमेन्स स्टडीज सेंटरअंतर्गत विद्यापीठातील शैक्षणिक विभाग व विद्यापीठाच्या सर्व संलग्नित महाविद्यालयातील शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आली. या निबंध स्पर्धेसाठी 'घरकामात पुरुषांचा सहभाग', 'कोविड - १९ आणि स्त्रियांमधील बेरोजगारिता', 'सार्वजनिक ठिकाणी घडणारी स्त्रियांविरुद्ध हिंसा', असे तीन विषय देण्यात आले होते. या निबंध स्पर्धेसाठी एकूण ३५ विद्यार्थ्यांनी निबंध पाठविले होते. स्पर्धेत प्राप्त निबंधांचे परीक्षकांकडून परीक्षण करण्यात आले. त्याद्वारे स्पर्धेचा निकाल जाहीर करण्यात आला.

त्यानुसार या निबंध स्पर्धेत अमरावती येथील श्री. शिवाजी शिक्षण महाविद्यालयामधील गौरव सुधाकर लाहे यांचा प्रथम क्रमांक आला असून त्यांचा 'घरकामात पुरुषांचा सहभाग' याविषयावर निबंध होता. द्वितीय क्रमांक जगदंब महाविद्यालय, अचलपूर येथील मदीहा ईरम मजीद खान यांचा आला असून त्यांनी 'सार्वजनिक ठिकाणी घडणारी स्त्रियांविरुद्ध हिंसा' याविषयावर निबंध होता.

तर तृतीय क्रमांक श्री. शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय अमरावती येथील पूनम गजानन राठोड यांचा आला असून त्यांनी 'सार्वजनिक ठिकाणी घडणारी स्त्रियांविरुद्ध हिंसा' याविषयावर निबंध होता.

निबंध स्पर्धेतील पहिल्या तीन क्रमांकांना पारितोषिक म्हणून ग्रंथभेट देण्यात आले असून त्यामध्ये प्रथम क्रमांकाला शब्द पब्लिकेशन, मुंबईद्वारा प्रकाशित आणि वंदना भागवत आणि इतर संपादित 'संदर्भासहित स्त्रीवाद : स्त्रीवादाचे समकालीन चर्चाविश्व' हा ग्रंथ, द्वितीय क्रमांकाला पद्मगंधा प्रकाशन, पुणेद्वारा प्रकाशित आणि सिमोन द बोव्हुआर लिखित व करुणा गोखले अनुवादित 'द सेकंड सेक्स' हा ग्रंथ तर तृतीय क्रमांकाला मौज प्रकाशन, मुंबई द्वारा प्रकाशित आणि डॉ. नीलिमा गुंडी संपादित 'स्त्रीमिती निवडक मिळून साऱ्याजणी' हा ग्रंथ पारितोषिक म्हणून भेट देण्यात आला. या निबंध स्पर्धेतील निबंधांचे परीक्षण डॉ. अंजली वाठ यांनी केले.

# विद्यापीठातील वुमेन्स स्टडीज सेंटर अंतर्गत घेण्यात आलेल्या निबंध स्पर्धेचा निकाल जाहीर

अमरावती दि. २१ : कोविड -१९ या महामारीचे परिणाम जगभर दिसून आलेत. त्यामुळे व्यक्तिगत, सार्वजनिक जीवनात अनेक समस्या निर्माण झाल्यात. या पार्श्वभूमीवर नव्या पिढीचे मते जाणून घेण्याच्या दृष्टीने संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील वुमेन्स स्टडीज सेंटर अंतर्गत विद्यापीठातील शैक्षणिक विभाग व विद्यापीठाच्या सर्व संलग्नित महाविद्यालयातील शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आली. या निबंध स्पर्धेसाठी 'घरकामात पुरुषांचा सहभाग', 'कोविड -१९ आणि स्त्रियांमधील बेरोजगारिता', 'सार्वजनिक ठिकाणी घडणारी स्त्रियांविरुद्ध हिंसा', असे तीन विषय देण्यात आले होते. या निबंध स्पर्धेसाठी एकूण ३५ विद्यार्थ्यांनी निबंध पाठविले होते. स्पर्धेत प्राप्त निबंधांचे परीक्षकांकडून परीक्षण करण्यात आले. त्याद्वारे स्पर्धेचा निकाल जाहीर करण्यात आला आहे.



त्यानुसार या निबंध स्पर्धेत अमरावती येथील श्री. शिवाजी शिक्षण महाविद्यालयामधील गौरव सुधाकर लाहे यांचा प्रथम क्रमांक आला असून त्यांनी 'घरकामात पुरुषांचा सहभाग' याविषयावर निबंध होता. द्वितीय क्रमांक जगदंब महाविद्यालय, अचलपूर येथील मदीहा ईरम मजीद खान यांचा आला असून त्यांनी 'सार्वजनिक ठिकाणी घडणारी स्त्रियांविरुद्ध हिंसा' याविषयावर निबंध होता. तर तृतीय क्रमांक श्री. शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय अमरावती येथील पूनम गजानन राठोड यांचा आला असून त्यांनी 'सार्वजनिक ठिकाणी घडणारी स्त्रियांविरुद्ध हिंसा' याविषयावर निबंध होता.



निबंध स्पर्धेतील पहिल्या तीन क्रमांकांना पारितोषिक म्हणून ग्रंथभेट देण्यात आले असून त्यामध्ये प्रथम क्रमांकाला शब्द पब्लिकेशन, मुंबईद्वारा प्रकाशित आणि वंदना भागवत आणि इतर संपादित 'संदर्भासहित स्त्रीवाद : स्त्रीवादाचे समकालीन चर्चाविश्व' हा ग्रंथ, द्वितीय क्रमांकाला पद्मगंधा प्रकाशन, पुणेद्वारा प्रकाशित आणि सिमोन द बोव्हुआर लिखित व करुणा गोखले अनुवादित 'द सेकंड सेक्स' हा ग्रंथ तर तृतीय क्रमांकाला मौज प्रकाशन, मुंबई द्वारा प्रकाशित आणि डॉ. नीलिमा गुंडी संपादित 'स्त्रीमिती निवडक मिळून साऱ्याजणी' हा ग्रंथ पारितोषिक म्हणून भेट देण्यात आलेत. या निबंध स्पर्धेतील निबंधांचे परीक्षण तक्षशीला महाविद्यालयातील समाजशास्त्र विभागप्रमुख डॉ. अंजली वाठ यांनी केले.


निबंध स्पर्धा
बक्षीस वितरण सोहळा
REDMI NOTE 9 PRO MAX
AI QUAD CAMERA